**संफौ.ख.क्र. ५६७/२०२४**

**निशाणी –१ लगत**

## न्यायनिर्णय

(घोषित केल्याचा दिनांक – १२ मार्च, २०२६ )

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्रान्वये दि.०९ मार्च, २०२६ ते दि. १३ मार्च २०२६ या कालावधीत फौ.प्र.सं. कलम २५६ व २५८ नुसार प्रकरण निकाली काढण्याकरीता स्पेशल ड्राइव्हचे आयोजन केलेले आहे. त्यामुळे, अभियोग पक्षाचा पुरावा फौजदारी प्रक्रीया संहिता कलम २५८ अन्वये बंद करण्यात आला.

२) याकामी अभियोग पक्षातर्फे करण्यात आलेला युक्तिवाद ऐकता व सादर करण्यात आलेला पूरावा पाहता माझ्या विचारार्थ निघालेले मुद्दे व निष्कर्ष खालीलप्रमाणे–

| **अ.क्र.** | **विचारार्थ मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | दि. २९/०४/२०२४ रोजी ०६.०० वाजेच्या दरम्यान पानसवाडी शिवारात मुळा फॅक्ट्रीसमोर, ता.नेवासा जि. अहमदनगर येथे आरोपीने विनापरवाना बेकायदेशीररीत्या ४,००० रुपये किंमतीची देशी दारु विक्री करताना व २०० लिटर हातभट्टी दारू तयार करण्याचे रसायन रक्कम रूपये १०,०००/– तयार करताना आढळून आला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही |
| २) | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ बाबत –**

३) अ.सा.क्र. १ पो.कॉ. सुनिल एकनाथ ढोले व अ.सा.क्र. ३ पो.उप.नि. काकासाहेब बापु राख यांनी त्यांच्या पुराव्यात असे सांगितले आहे की, दि. २८/०४/२०२४ रोजी सोनई पोलीस स्टेशन येथे सहा.फौ. या पदावर कार्यरत होते. सदर दिवशी ए.पी.आय शेळके यांना गुप्त बातमीदारांमार्फत बातमी मिळाली की, पानसवाडी शिवारात काही इसम हातभट्टीची दारु तयार करत आहे. त्यानंतर ए.पी.आय शेळके, पो.हे.कॉ. गावडे, पो.कॉ. गर्जे, पो.कॉ. आगाव यांनी त्या ठिकाणी छापा टाकला असता आरोपी व मुद्देमाल मिळुन आला. अ.सा.क्र. १ पो.कॉ. ढोले यांनी फिर्याद शाबीत केली.

ASHATAI NARAYAN SARAK
Digitally signed by ASHATAI NARAYAN SARAK
Date: 2026.03.12 18:04:14 +0530

४) अभियोग पक्षाचा पुरावा विचारात घेता, ज्या घटनास्थळावर आरोपीविरुध्द

कार्यवाही करण्यात आली. त्या घटनास्थळाचा स्वतंत्र पंचनामा प्रस्तुत कामी दाखल केलेला नाही. जप्ती पंचनामा स्वतंत्र पंच मार्फत शाबित करण्यात आलेला नाही. केवळ फिर्याद शाबित झाली म्हणून आरोपीस दोषी धरता येणार नाही. त्यामुळे घटनास्थळावरुन मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातून जप्त केला हे शाबित होत नाही. घटनास्थळाची झडती घेणेपुर्वी पोलिसांच्या अंगझडतीचा पंचनामा केलेला नाही. वरील साक्षीदार हे पोलीस कर्मचारी आहेत. सदर साक्षीदारांनी जरी अभियोग पक्षाच्या कथनांची पुनरावृत्ती केली असली तरी त्यांच्या कथनास दुजोरा देणारा स्वतंत्र त्रयस्थ साक्षीदाराचा पुरावा याकामी नोंदवलेला नाही. त्यामुळे आरोपीच्या ताब्यातून दारु हा मुद्देमाल जप्त केला या अभियोग पक्षाच्या कथनावर संशय निर्माण होतो.

५) प्रस्तुत प्रकरणामध्ये जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य केले नसल्याने आरोपीकडुन देशी दारु जप्त केली याबाबत साशंकता निर्माण होते. त्यामुळे आरोपीच्या ताब्यात देशी दारु मिळुन आली असा निष्कर्ष काढता येणार नाही. अशा परिस्थितीत आरोपीच्या ताब्यातून कोणताही मद्यसाठा जप्त झाला हे निःसंशयितपणे सिध्द होत नाही. रासायनिक विश्लेषण अहवाल अभिलेखावर दाखल नाही. वाहकाचा जबाब नोंदवलेला नाही. रासायनिक विश्लेषण अहवालाशिवाय सदर मुद्देमाल दारू होता हे शाबीत होत नाही. सबब, मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी स्वरुपात देत आहे. मुद्दा क्र. २ च्या नकारार्थी निष्कर्षाअंती मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| (१) | आरोपीची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५८ अन्वये मुंबई दारूबंदी कायदा कलम ६५–ई नुसार दंडास पात्र असलेल्या गुन्हयातून निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| (२) | आरोपीने दिलेला जामीन व वैयक्तिक जातमुचलका रद्द करण्यात येतो. |
| (३) | अपीलाचा कालावधी संपल्यानंतर जप्त मुद्देमाल योग्य विल्हेवाट करण्याकरीता राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे पाठविण्यात यावा. |

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषीत करण्यात आला.)

ASHATAI NARAYAN SARAK Digitally signed by ASHATAI NARAYAN SARAK Date: 2026.03.12 18:04:20 +0530

दिनांक – १२/०३/२०२६

**( ए. एन. सरक )**

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

न्यायालय क्र.३, नेवासा.